दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/१६/२०१९
दि.२८/०२/२०१९.

माहितीचा अधिकार

O/C

**<u>प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.</u>**

श्री.चतुर्भुजा शिवसागर पाण्डेय, ................अपिलार्थी
सी/११०, त्रिलोक दर्शन सहकारी गृह निर्माण संस्था,
बी.पी.रोड, भाईंदर (पूर्व), जि.ठाणे ४०११०५.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग

## -: विवेचन :-

श्री.चतुर्भुजा शिवसागर पाण्डेय यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडे दि.०९/०१/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) श्री.हंसराज मेश्राम की इस विभाग मे नियुक्ति कब हुई तथा विभाग मे इनकी तैनाती कहॉ कहॉ किस किस पद पर किस अवधि तक रही कृपया अद्यतन प्रमाणित सूचना उपलब्ध कराने का कष्ट करे।

२) श्री.हंसराज मेश्राम की इस विभाग मे प्रथम नियुक्ति के समय किन शैक्षणिक योग्यता सहित अन्य योग्यता प्रमाणपत्रों के आधार पर नियुक्ति हुई थी कृपया नियुक्ति से संबधित समस्त अभिलेखों की प्रमाणित प्रतियां उपलब्ध कराने का कष्ट करे।

३) मनपा वन विभाग मे प्रथम श्रेणी से लेकर चतुर्थ श्रेणी के अधिकारियों एंव कर्मचारियों को लगातार एक ही स्थान पर कार्यरत रहने से संबंधित शासनादेश, विभागीय आदेश एंव अन्य कोई आदेश, जिसके आलोक मे अधिकारियों एंव कर्मचारियों को तैनात रखा जाता हो उस समस्त की प्रमाणित प्रतियॉ उपलब्ध कराने का कष्ट करें।

४) श्री.हंसराज मेश्राम, उप-अधीक्षक (वन विभाग), मुख्यालय मिरा भाईंदर मनपा के इस पद पर कार्यरत रहने की अवधि मे इनके विरुध्द जनसाधारण द्वारा की गई शिकायतों एंव शासन/ विभाग द्वारा शिकायतों एंव अन्य के संबंध मे की गई जॉचों से संबंधित समस्त अभिलेखों की अद्यतन सूचना प्रमाणित अभिलेखों सहित उपलब्ध कराने का कष्ट करे।

**<u>अपिल दाखल करण्याची कारणे:-</u>**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१२/०२/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

Scanned by CamScanner

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०१/०३/२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/०२२/२०१९ दि.२१/०२/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग हे १४६ ओवळा माजिवडा निवडणूक कार्यालय येथे बैठकीसाठी गेले असल्याकारणाने सुनावणीस अनुपस्थित असुन सहा.जनमाहिती अधिकारी तथा लिपिक व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.०९/०१/२०१९ रोजीच्या पत्रानुसार माहिती प्राप्त झालेली नाही.

२) **सहा.जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास आज दि.२८/०२/२०१९ रोजी हस्ते माहिती विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

01/03/2019

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.चतुर्भुजा शिवसागर पाण्डेय,
सी/११०, त्रिलोक दर्शन सहकारी गृह निर्माण संस्था,
बी.पी.रोड, भाईंदर (पूर्व), जि.ठाणे ४०११०५.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग — for 11/03/2019

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner